# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू

पत्ता,रुपाली पार्क, इराणी रोड, डहाणू, ता. डहाणू, जि.पालघर

जा.क्र./सनिड/बी.२/आनंद मंगल हौ./७७ अ/३१४/२०१८. दिनांक :-१४/०३//२०१८

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये आदेश**

**वाचावे :-**१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)
२) संस्थेच्या सभासदांचा दि. ०७/०३/२०१८ चा तक्रार अर्ज

ज्याअर्थी **आनंद मंगल को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. डहाणू, जि. पालघर,** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीनुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून ती या कार्यालयाच्या अखत्यारीत येत आहे. आणि,

ज्याअर्थी नोंदणीकृत सहकारी संस्थेचे कामकाज कायदा कलम, नियम व मंजूर उपविधीनूसार चालविणे संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर बंधनकारक आहे आणि,

ज्याअर्थी संस्थेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ संपलेला आहे. संस्थेचा सन २००८ पासून व्यवहार ठप्प झालेला आहे. व संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणेबाबत संदर्भिय क्र. २ च्या अर्जान्वये विनंती केली आहे आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (१)आय नूसार समितीची मुदत संपण्यापुर्वी कलम ७३ क ब च्या पोट कलम(१४) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे तीची निवडणुक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाला कळविणे हे संस्थेचे कर्तव्य असेल (२) समितीने तीची निवडणुक घेण्यासंबंधात पोटकलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाला कळविण्यास बुध्दीपुरस्सर कसूर केली असेल तर, आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापुर्वी समितीची निवडणुक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील आणि अशा परिस्थित निबंधक अधिनियमाच्या कलम ७७ अ अन्वये योजिल्याप्रमाणे कारवाई करील आणि,

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी सुरेश अंधारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू, सदर आदेशान्वये **आनंद मंगल को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. डहाणू, जि. पालघर** या संस्थेच्या समितीची निवडणुक घेवून नवीन समिती गठीत होईपर्यंत संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी खालील प्रमाणे प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी

Scanned by CamScanner